**प्रेस नोट १६/०७/२०१९**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**
**संगमब्रिज पुलावरुन पडलेल्या इसमाचा जीव वाचविले बाबत.**

दि.१६/०७/२०१९ रोजी रात्रौ १२.३० वा चे सुमारास इसम नामे युवराज विजय सावंत रा.रास्तापेठ हा रेल्वे पुलाजवळील मोकळया जागेतुन गप्पा मारत बसलेल्या आपल्या मित्रांकडे पायी चालत जात असताना अचानक त्याचा तोल जावुन तो रेल्वे पुला खालच्या सिमेंटच्या कठडयावर पडुन त्यास गंभीर दुखापत झाली आहे अशी शिवाजीनगर परिसरातील नागरीकाकडुन खबर मिळाल्याने रात्रगस्तीकरीता असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळासाहेब कोपनर यांनी तात्काळ आपली हद्द न पाहता अग्निशमन दलास व जीवरक्षक राजेश काची यांना सदरची माहिती देवुन स्टाफसह सदर ठिकाणी पोहचुन` अग्नीशमन दलाचे जवान व जीव रक्षक राजेश काची यांचे मदतीने सिंमेंटच्या कठडयावर पडलेल्या जखमी युवराज यास जाळीच्या साहयाने बाहेर काढुन तात्काळ पुढील उपचारकामी ससुन हॉस्पीटल येथे दाखल केले आहे.

वरील नमुद कार्यवाही ही श्री बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे,सपोफौ शेलार,पोशि होळकर व जीवरक्षक राजेश काची यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर